VOL- VIII ISSUE- IX SEPTEMBER 2021 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.149 ISSN 2349-638x

# कारणमिमांसेचे इतिहासातील महत्व

**प्रा.डॉ.महेंद्र गायकवाड**
सहयोगी प्राध्यापक
इतिहास विभाग
डॉ.मधुकरराव वासनिक पी.डब्ल्यू.एस.कला,वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय कामठी रोड नागपूर

**सारांश :-**

*इतिहासाला जर शास्त्राचा दर्जा मिळवुन द्यायचा असेल तर ज्याप्रमाने शास्त्रांमध्ये कार्यकारणभाव प्रस्थापित केला जातो तद्वतच इतिहासामध्येसुद्धा कार्यकारणभाव प्रस्तापित केला जावा अशी रास्त अपेक्षा इतिहासकाराकडुन केली जाते.इतिहासात नुसतेच काय आणि कसे घडले? हे सांगुन अर्थ नाही तर ते का घडले? याच्या स्पष्टीकरणाने इतिहासलेखन अर्थपुर्ण होत असते. कारणमिमांसा हा इतिहासाचा आत्मा असुन त्याखेरिज इतिहास अर्थपुर्ण होत नाही.इतिहासकाराला घटनेमागिल कारणांचा शोध घेणे आवश्यक असते.ऐतिहासिक घटना कार्यकारण प्रकियेच्या धाग्याने बांधलेल्या असाव्या लागतात.ऐतिहासिक घटना का घडली? याचे स्पष्टीकरण देण्यासाठी कार्यकारणभाव प्रस्तापीत केला पाहिजे.कारण हे मानवी विचार व मनोव्यवहाराचे निदर्शक असते.कारणांच्या प्रभावाचा घटनेच्या परिणामाशी सबंध असतो.कारण ही संकल्पना कार्य घडविणारी महत्वाची प्रकिया आहे. इतिहासकाराने एखादी घटना का घडली? याचा खुलासा म्हणजे घटनेचे कारण दिले पाहिजे.हिरोडोटसपासुन अनेक इतिहासकारांना सत्य शोधण्यासाठी कारणांची आवश्यकता भासत आली आहे*

***शब्दकुंजी (की वर्ड)**:- कारणमिमांसा म्हणजे काय,कारणमिमांसेचे स्पष्टीकरण,कारणांचा शोध,कारणमिमांसेच्या समस्या,कारणमिमांसेचे सिद्धांत,कारणमिमांसा आणि संदर्भ*

**प्रास्ताविक :-**

इतिहासाला जर शास्त्राचा दर्जा मिळवुन द्यायचा असेल तर ज्याप्रमाने शास्त्रांमध्ये कार्यकारणभाव प्रस्थापित केला जातो तद्वतच इतिहासामध्येसुद्धा कार्यकारणभाव प्रस्तापित केला जावा अशी रास्त अपेक्षा इतिहासकाराकडुन केली जाते.इतिहासात नुसतेच काय आणि कसे घडले? हे सांगुन अर्थ नाही तर ते का घडले? याच्या स्पष्टीकरणाने इतिहासलेखन अर्थपुर्ण होत असते.डॉ. शांता कोठेकर लिहितात,**"कारणमिमांसेमुळे घटना अर्थपुर्ण बनतात,घटनांचे आकलन समर्पकपने होते एरवी कारणमिमांसेखेरिज झालेले इतिहासलेखन म्हणजे घटनांची जंत्री ठरते,"**[१]

कारणमिमांसा हा इतिहासाचा आत्मा असुन त्याखेरिज इतिहास अर्थपुर्ण होत नाही.इतिहासकाराला घटनेमागिल कारणांचा शोध घेणे आवश्यक असते.ऐतिहासिक घटना कार्यकारण प्रकियेच्या धाग्याने बांधलेल्या असाव्या लागतात. ऐतिहासिक घटना का घडली? याचे स्पष्टीकरण देण्यासाठी कार्यकारणभाव प्रस्तापीत केला पाहिजे.कारण हे मानवी विचार व मनोव्यवहाराचे निदर्शक असते.कारणांच्या प्रभावाचा घटनेच्या परिणामाशी सबंध असतो.कारण ही संकल्पना कार्य घडविणारी महत्वाची प्रकिया आहे.त्यामुळे इतिहासकाराने,**"प्रत्येक घटना चिकित्सकपने निरखुन व पारखुन घेतली पाहिजे तसेच त्यांच्यातील कारणपरंपरा प्रस्तापित करूण दाखविली पाहिजे,"**[२]

इतिहासकाराने एखादी घटना का घडली? याचा खुलासा म्हणजे घटनेचे कारण दिले पाहिजे.हिरोडोटसपासुन अनेक इतिहासकारांना सत्य शोधण्यासाठी कारणांची आवश्यकता भासत आली आहे.ऐतिहासिक कार्यकारणभावाविषयी डॉ. प्रभाकर गंद्रे लिहितात की,**"भुतकालीन घटनांच्या विविध कारणांचा शोध घेऊन त्याच्या परिणामाची व्याख्या इतिहास होय. इतिहासकार वर्तमानाच्या संदर्भात इतिहास सादर करतो हे सादरीकरणच कारणाचे सादरीकरण आहे.तेच कोणत्याही घटनाचे कारण व कार्य आहे,"**[३]

इतिहासलेखनशास्त्रात कारणमिमांसा उच्च दर्जाच्या इतिहास लेखनाचे लक्षण मानल्या जावू लागले आहे. कारणमिमांसेखेरिज इतिहास निर्जीव ठरतो.प्रत्येक घटनेमागे कारण असते,त्या घटनेचे परिणाम म्हणजे पुढे घडणा-या घटनेचे कारण असते.अशी कारण परिणामाची कडी तयार होते आणि अशी एक-एक कडी जुळवत गेले की,घटनांचा अन्वयार्थ लागतो.अन्यथा इतिहासलेखन नीरस बनते. त्यामुळेच डॉ.बी.एन.सरदेसाई लिहितात,**"इतिहासामध्ये सत्याकडे जाण्याचा मार्ग कार्यकारणभावाच्या वाटेवरूण जात असतो,"**[४]

### १) कार्यकारणभाव म्हणजे काय?

इतिहासात घटनांचा अभ्यास केला जातो. ऐतिहासिक घटनांचे स्पष्टीकरण करतांना अनेक कारणे दिली जातात कारण हे घटनेचे स्पष्टीकरण असते.कारण म्हणजे घटना किंवा प्रसंगाचे अंतस्थ तार्किक स्वरूप होय. घटना कशी घडली हे सिद्ध करण्यासाठी कार्यकारणभाव प्रस्थापित केला जातो.इतिहासकाराने एखादी घटना का घडली?त्या कारणांचा शोध घेऊन नेमके कारण सांगितले पाहिजे त्यामुळे घटनांना अन्वयार्थ प्राप्त होतो.एखादी घटना कशी घडली? हे सिद्ध करण्यासाठी कार्यकारणभाव प्रस्तापित केला जातो.प्रा.गफुर शेख लिहितात,**"घटना आणि परिणाम यांच्या सबंधाच्या नियमास कार्यकारणभाव असे म्हणतात,"**[५]

इतिहासाला प्रत्येक कृतिमागिल,घटनेमागिल कारणांचा शोध घ्यावयाचा असतो यालाच घटनांची कारणमिमांसा म्हणायचे.कारणमिमांसा ही कारणांचा शोध घेण्याची प्रकिया आहे.इतिहासकाराने असे का घडले?या प्रश्नाचे उत्तर उलगडुन दाखविने म्हणजे इतिहासातील कार्यकारणभाव होय.प्रा.गायकवाड,डॉ.सरदेसाई आणि प्रा. हनमाने लिहितात की,**"इतिहासात घटनांचा अभ्यास करावयाचा असतो.या घटना म्हणजे अनेक धागे आहेत अशी जर कल्पना केली तर हे सर्व धागे एकत्र करून त्याचे वस्त्र तयार करण्यासाठी मध्ये जे धागे वापरावे लागतील त्या धाग्यांना कारण असे म्हणावे लागेल,"**[६]

इतिहासलेखनशास्त्रातील कार्यकारणभाव म्हणजे काय ? हे समजण्यासाठी आपन एक उदाहरण पाहू या.

<u>उदाहरण:-</u>दुधाच्या भांडयावरील झाकन हलण्याची अनेक कारणे असतात दुधामध्ये उकळण्याचा गुणधर्म आसतो.हे कारण शास्त्रीय कसोटीवर टिकू शकत नाही कारण इतर पदार्थातही उकळण्याचा गुणधर्म असतो भांडयाला जाळ लागला त्यामुळे दुध तापले,दुधावर झाकन असल्यामुळे वाफ तयार झाली.वाफेच्या शक्तीमुळे झाकन हलू लागले म्हणजे हलने हा दुधाचाही गुणधर्म नाही किंवा झाकणाचाही गुणधर्म नाही तर वाफेच्या शक्तिचा तो एक आविष्कार आहे तेव्हा आपन असे म्हणू की,वाफेमुळे झाकन हालते तेव्हा त्या घटनेमागिल कार्यकारणभाव प्रस्तापित होतो.

ग्रिक इतिहासकार हिरोडोटसही कार्यकारणभावाला महत्वाचे मानतो.मॉन्टेस्क्यूने पहिल्यांदा कार्यकारणभावासबंधी चर्चा केली.ऐतिहासिक घटना कारणपरंपरेमध्ये दाखविता येतात असा विचार त्यांनी मांडला.यानंतर इतिहासकारांनी गतकाळाचे ज्ञान कोणत्या प्रकियेमध्ये बसविता येईल याविषयी विचार मंथन करूण गतकालीन घटना या कार्यकारणभाव आणि नियम यांच्या आधारावर मांडता येईल या निष्कर्षावर पोहचलेत.इतिहासकार एकाचवेळी अनेक कारणांची परंपरा देण्यास समर्थ असेलच असे नाही म्हणून प्रत्येक इतिहासकार आपल्या पात्रतेनुसार कारणांचा अभ्यास करतो त्यामुळे ती वैयक्तिक स्वरूपाची असते. इतिहासकाराच्या नजरेसमोर कारण असतात त्यापैकी कोणते किती महत्वाचे ही क्रमवारी ठरविण्यामध्येच इतिहासकाराचे श्रेष्ठत्व असते. ऐतिहासिक कार्यकारणभाव हा व्यक्तिसापेक्ष असते कारण एकाच घटनेची अनेक कारणे असतात. ती पाहणा-यांवर अवलंबुन असतात.प्रा.गायकवाड,डॉ.सरदेसाई आणि प्रा.हनमाने लिहितात की,**"कार्यकारणभाव ही इतिहासामध्ये इतकी आवश्यक व गरजेची बाब आहे की,ती इतिहासापासुन वेगळी करता येत नाही.जणू काही ती इतिहासाची एक उपशाखाच आहे कार्यकारणभावाचे साधन इतिहासकाराच्या हातात असणे फार आवश्यक आहेत,"**[७]

साधारणतः ऐतिहासिक घटनेचा अर्थ हा जास्तीत जास्त महत्वाच्या कारणांच्या संदर्भातच लावला जातो . कार्यकारणभाव प्रस्तापित करतांना भावनेच्या आहारी जाऊन अशास्त्रीय पद्धतीने कोणतीही कारणे जोडण्याचा प्रयत्न करू नये. इतिहासकाराने कारणांचा उपयोग ऐतिहासिक घटना योग्य शब्दात मांडण्यासाठी असतो हे विसरता कामा नये. प्रो.कार्ल गुस्टावसन म्हणतात की,अनेक घटनांचा एक परिणाम असतो व अशा अनेक स्पष्टीकरणातुन ऐतिहासिक

प्रसंगाचे वर्णन करता येते.ऐतिहासिक घटनेचे स्पष्टीकरण एकच कारण पुरेसे देऊ शकत नाही.

**२) इतिहासकार घटनांचे स्पष्टीकरण कसे करतात?**

इतिहासकार घटनांचे अनेक मार्गानी स्पष्टीकरण देत असतो.अशा स्पष्टीकरणामध्ये इतिहासकारावर ज्या तत्वज्ञानाचा प्रभाव पडलेला असतो त्यानुसार तो स्पष्टीकरण करीत असतो. ब-याचवेळा इतिहासकार घटनेचे स्पष्टीकरण देण्यासाठी जे अनेक शब्द वापरतात त्यामुळे पारिभाषीक शब्दाचा गोधळ उडण्याची शक्यता आहे,परंतु तसा गोधळ होण्याचे कारण नाही.कारण प्रत्येकाला कार्यकारणभाव हाच जोडुन दाखवायचा असतो फक्त तो शब्द वेगळे वापरतो.

टेनने स्पष्टीकरणाचा सिद्धांत मांडला आहे.तो असे म्हणतो की, ही गोष्ट सर्वश्रृत आहे की,एक घटना दुस-या घटनेशी कारण म्हणुन जेव्हा जोडली जाते तेव्हा कारणे व परिणाम यांची एक साखळी तयार होते.अशी साखळी तयार झाल्यानंतर आपल्याला असे वाटते की,आपन एका नव्या पद्धतीची सुरूवात केली आहे परतु आपन कारणे कोणत्या गोष्टीने जोडली जातात हे शोधुन काढू शकत नाही.

कारणांची संगतवार मांडणी करतांना घटनेच्या जवळच्या कारणालाच महत्वाचे मानले जाते किंवा एखाद्या घटनेचे श्रेय एखाद्या व्यक्तिला दिले जाते तसेच त्याचा दोष एखाद्या व्यक्तिच्या पदरी बांधला जातो.अशा मंडळीला अतिसुलभीकरण असे म्हणतात.कोणत्याही घटनेमागे अनेक कारणे असतात. घटनेच्या अंतर्भागात शिरून शोध घेणे श्रेष्ठ इतिहासकाराचे लक्षन आहे.ऐतिहासिक घटनांचे स्पष्टीकरण करतांना महत्वाच्या ऐतिहासिक घटनांमागे कारणांची दीर्घकालीन परंपरा असते हे लक्षात आले तर घटनांचा अर्थ लावता येतो त्यामुळे बहुविध कारणांचा शोध घेणे उच्च दर्जाच्या इतिहासकाराचे लक्षण मानले जाते . ऐतिहासिक कारणे विपुल व समृद्ध असतात.

**३) ऐतिहासिक कारणांचा शोध घेतांना विचारात घ्यावयाच्या बाबी :**

ऐतिहासिक कारणांचा शोध घेतांना ध्यानात घ्यावयाच्या बाबीविषयी डॉ.शांता कोढेकर लिहितात की,**“पहिला मुद्दा असा की,कोणतीही मानवी कृती कारणाशिवाय घडत नाही,प्रत्येक घटनेमागे,कृतीमागे मग ती कितीही मोठी अगर शुल्लक असो,जाणिव पुर्वक केलेली असो वा अजानता केलेली असो,त्यामागे कारण असते,”**[६]

ऐतिहासिक कारणांचा शोध घेतांना मोठया महत्वाच्या घटनांच्या मागे एकच नव्हे तर अनेक कारणे असतात हे विसरता येत नाही.केवळ एका कारणाच्या निर्देशाने घटनेमागिल कारणांचा बोध होत नाही.संशोधकाच्या हाती आलेली कारणे सारख्याच महत्वाची नसतात काही कारणे महत्वाची तर काही गौण आहेत हा निर्णय इतिहासकारास करायचा असतो.इतिहासकाराच्या हाती कारणे आले की त्याची वर्गवारी ठरवावी लागते.कारणांची जुळवणुक करतांना ती तर्कसंगत असतिल तरच त्यातुन तर्कशुद्ध निष्कर्ष निघू शकतो.

प्रा.कार्ल गुस्टावसन यांनी कारणांचा शोध घेतांना विचारात घ्यावयाच्या बाबी सांगितल्या आहेत

१) घटनेचे/कृतीमागिल जवळचे कारण कोणते?
२) त्यामागे वैचारिक भुमिका आढळते काय?
३) त्या वैचारीक भुमिकेचे प्रत्यंतर त्यापुर्वी आढळते काय?
४) त्या घटनेशी कोणकोणत्या व्यक्ति सबंधित आहेत? त्या एकाच गटातील की,भिन्न गटातील आहेत
५) त्यांची शक्तिस्थळे अगर दौर्बल्य कशात होत?त्याचा ऐतिहासिक घटनेशी सबंध दिसतो का?
६) त्या घटनेबाबत समाजातील भिन्न घटकांची काय प्रतिक्रिया होती?
७) त्या घटनेपुर्वी काही लक्षणिय असे राजकीय स्वरूपाचे अथवा तंत्रज्ञानात बदल झाले होते काय?
८) त्या घटनास्थळाची भौगोलिक स्थिती काय होती?
९)तत्कालीन भिन्न क्षेत्रातील संस्थांशी त्या घटनेचा सबंध होता का?या प्रश्नांचे उत्तरे शोधल्यास सर्व कारणांचा शोध घेतला जाईल याविषयी शंका नाही.

**४) कार्यकारणपरंपरेतील समस्या :**

इतिहासामध्ये कार्यपरंपरा देता येते काय?अशी समस्या निर्मान होते.केनिथ स्टॅम्प म्हणतो की,गणितातील अचुकपना इतिहासामध्ये कधिही येणे श्क्य नाही. इतिहासकार ज्यावेळी काही निष्कर्ष काढतो तेव्हा त्याच्या जवळचे पुरावे हे अतिशय तुटपुंजे ,मानवी स्वभावाची कमी माहिती,तसेच ऐतिहासिक घटना वेगळया करूण पाहण्याची क्षमता कमी असते.इतिहासकाराने निष्कर्ष काढीत असतांना प्रयोगात्मक पद्धतीने सांगावेत कारण ही संकल्पना इतकी

विशाल आहे की स्थल आणि काल याच्या चौकटीत बसविता येनार नाही.म्हणुन एखाद्या घटनेमागिल कार्यकारणभाव प्रस्थापित करणे ही एक समस्याच आहे.प्रो. जी.जे रेनियर म्हणतात की,**“जर आपन कारणाला गृहितकृत्य म्हटले तर काही लोकांचा असा समज होण्याची शक्यता आहे की ऐतिहासिक कारणावरून भवितव्य वर्तविता येईल,”**[९]

प्रो. वाल्श म्हणतात की,इतिहासकारांना विषय मांडणीसाठी कोणती कारणे स्वीकारावयाची यासबंधी निश्चीत माहिती नसते.त्यामुळे त्यांचा गोंधळ होतो.इतिहासकारामध्ये घटनेच्या कार्यकारणभावामध्येच अनेकदा एकमत होत नाही.डॉ.बी. एन.सरदेसाई लिहितात की,**“कारणे शोधत असतांना योग्य घटना घेतल्या पाहिजेत व त्यामधुन तार्किकदृष्ट्या योग्य कारणे स्वीकारली पाहिजेत या कारण निवड प्रकियेमध्ये वस्तुनिष्ठता महत्वाची आहे,”**[१०]

प्रो.कोहेन म्हणतात,“कारणपरंपरा म्हणजे एखादी घटना घडत असतांना जी आवश्यक व पुरेशी परिस्थिती असते त्याचे दिग्दर्शन करणारी संकल्पना होय.प्रत्यक्षार्थवादी लोकांच्या म्हणण्यानुसार जरी जरूर ती व पुरेशी परिस्थिती असे म्हटले असले तरी कोणती परिस्थिती ही जरूर व पुरेशी हे ठरविणे अवघड आहे.कोणताही इतिहासकार संपुर्ण परिस्थिती उभी करू शकणार नाही.म्हणुन कार्यकारण ही एक समस्याच आहे.

प्रो.आर.जी.कलिंगवुडच्या मते,ऐतिहासिक कारण ही संकल्पना मानवी जीवनाशी निगडीत असते कारण हे कधिही एकमेव असत नाही.अनेकविध परिस्थितीतुन कारणे निर्माण होत असतात कारण ही संकल्पना कार्य घडविनारी एक प्रकिया आहे.कारण यामागे मानवी मन ही संकल्पना अतिशय महत्वाची आहे.कोणत्याही घटनेचे हे कारण हे संशोधकाच्या विचारसरणीचे,मनोव्यवहाराचे निदर्शक असते म्हणुनच इतिहासामध्ये वस्तुनिष्ठ कारणाची समस्या निर्माण होते. वस्तुनिष्ठ कारणाच्या समस्येविषयी गायकवाड,सरदेसाई डॉ.बि.एन.व हनमाने लिहितात की,**“कारणपरंपरेमध्ये वस्तुनिष्ठता हा एक महत्वाचा भाग आहे.कारणे शोधत असतांना सर्वच कारणे वस्तुनिष्ठ असतील असे सांगता येत नाही काही वेळा एकाला वस्तुनिष्ठ वाटनारी कारणे दुस-याला व्यक्तिनिष्ठ वाटू शकतील,”**[११] कारणाच्या वस्तुनिष्ठतेविषयी असे म्हणता येईल की,दोन कारणांमध्ये जरूर तो सबंध प्रस्तापित करूण कारण व परिणाम हे सिद्ध करता आले पाहिजेत.

**५) कार्यकारणपरंपरेचे सिद्धांत** :इतिहासलेखनशास्त्रातील कार्यकारणपरंपरेचे पुढील सिद्धांत आहेत.

**अ) गुप्ततेचा सिद्धांत** : गुप्ततेच्या सिद्धांतामध्ये त्यातील शिर्षकाला अनुरोधुनच अशा घटना व कारणे शोधुन काढलेली असतात की,ती सर्व कारणे व घटना गुप्त असतात.उघड असत नाहीत हा सिद्धांत अमेरिकन यादवी युद्धाच्या वेळी प्रसिद्ध होता.यात उत्तरेच्या व दक्षिणेच्या इतिहासकारांनी एकमेकांवर टीका करूण आपला खरा हेतू लपवण्याचा प्रयत्न केला आहे.दोन्ही बाजू एकमेकांना आक्रमक म्हणतात त्यामुळे खरा आक्रमक कोण?हा प्रश्न शिल्लकच राहतो.गुप्ततेच्या सिद्धांताचे समर्थक या संकल्पनेच्या मुल्यमापनाच्या कसोटीवर निष्कर्ष काढण्यास तयार नसतात.अशा सिद्धांतामधिल सर्व घटना या उघडपणे न देता अंतर्भुत अशा स्वरूपाच्या असतात.

**ब) संघर्षाचा सिद्धांत** :अमेरिकन यादवी युद्धानंतर इतिहासकाराचे दोन पक्ष तयार झाले. दोन्ही पक्ष एकाच घटनेचा अन्वयार्थ स्वतंत्रपणे लावू लागले.दोन्ही पक्षात वैचारिक संघर्ष सुरू झाला.यातुनच संघर्षाचा सिद्धांत निर्माण झाला.उत्तरेकडिल इतिहासकार घटनांचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करू लागले तर दक्षिणेकडिल इतिहासकार परिस्थितीला दोष देऊ लागले.त्यामुळे दोन भिन्न विचारसरणी असणारी संस्थाने एकत्र राहणे शक्य नव्हते त्यातुन युद्ध हा एकच पर्याय होता.अलिकडच्या इतिहासकारांनीसुद्धा वेगवेगळया दृष्टिकोनातुन इतिहास लिहिला. दृष्टिकोणातील हा संघर्ष कोणत्या न कोणत्या परिस्थितीत अस्थित्वात असतोच.

**क) समन्वयाचा सिद्धांत** :

अमेरिकन यादवी युद्धाविषयी उत्तरेकडिल व दक्षिणेकडिल इतिहासकारांनी यादवी युद्धाचे वेगवेगळया दृष्टिकोणातुन जे सिद्धांत मांडले या लेखनाविरूद्ध या सिद्धांताविरूद्ध आवाज उठवुन काही इतिहासकारांनी एक स्वतंत्र सिद्धांत मांडला त्या सिद्धातालाच आवर्तनिय सिद्धांत असे म्हणतात.या सिद्धांतानुसार पहिल्या दोन्ही सिद्धांतामधिल एकाकीपणा काढुन टाकुन कोणत्याही पक्षाला दोष न देता घडलेल्या सर्व घटना व त्याचा अन्वयार्थ मानवजातीच्या हीताच्या दृष्टिने लावण्याचा प्रयत्न केला.

पुर्वीच्या दृष्टिकोणातील संघर्ष समाप्त करावयाचा होता. यादवी युद्धात ज्यांनी समन्वयकाची भुमिका घेतली ते पुढारी खरे नायक म्हणुन वर्णन करण्यात आले.या समन्वयवादी सिद्धांताने अमेरिकेतील संघर्षाचे वातावरण कमी करण्यास मदत झाली.

**ड) दैवी योजनेचा सिद्धांत :**

इतिहासात ज्या घटना घडतात त्यांच्या मुळाशी दैवी प्रेरणा असते.देव हाच इतिहासात घटना घडवुन आनत असतो या दैववादी सिद्धांतावर इजिप्शियन,बॅबिलोनियन व ग्रिक इतिहासकारांचा विस्वास होता. दैवी सिद्धांतानुसार दैवात लिहिलेल्या गोष्टी प्रत्यक्षात आनन्याचे काम श्रेष्ठ योद्धे,धर्मगुरू व राजा पार पाडित असत ही सर्व मानसे देवाचे प्रतिनिधी म्हणुन पृथ्वीवर काम करित असत . अर्थातच अशाप्रकारे दैवी कल्पनांचा मानवी हालचालीशी सबंध जोडल्यामुळे कार्यकारणभावात दैवी प्रेरणा शोधण्याची प्रवृत्ती निर्मान झाली.

**इ) बुद्धीवादी सिद्धांत :** युरोपात प्रबोधन युग सुरू झाले. जुण्या समजुती दुर होऊन प्रत्येक घटना बुद्धीवादाच्या कसोटीवर पारखण्याची प्रकिया सुरू झाली.ही प्रकिया समाजशास्त्रात लागू करण्यात आली.बुद्धीवादावर प्रत्येक घटना पारखुन पाहिल्यामुळे आध्यात्मिक व आत्मिक स्वरूपाचे ज्ञाण ही कल्पना किंवा आत्मिक प्रभाव हा प्रत्येक घटनेच्या मागे असतो ही कल्पना मागे पडली.प्रत्येक घटना ही कार्यकारण प्रकियेतुन तपासुन पाहण्याची पद्धत सुरू झाली.प्रत्येक घटनेच्या पाठीमागे सबळ कारण असते व ते शोधण्याची पद्धत सुरू झाली.

**ई) राष्टीय व्यक्तिमत्वाचा सिद्धांत :** १९ व्या शतकात युरोपात राष्टवादाची कल्पना उदयास आली.स्वत:च्या राष्टाविषयी बलिदान करण्याची मनाची तयारी म्हणजे राष्टवाद होय.प्रत्येक घटनेचे स्पष्टिकरण देत असतांना राष्टीय व्यक्तिमत्व कसे चांगल्यात चांगले घडविले जाईल या हेतुने कार्यकारण परंपरा यांच्यात सबंध प्रस्थापित करण्यात येऊ लागले परिणामी राष्टीय व्यक्तिमत्व घडविण्यासाठी इतिहास लिहिण्याची पद्धत सुरू झाली. इतिहास घडविणा-या व्यक्तिंना राष्टपुरूष म्हटल्या जावू लागले.

**फ) मानवी भावनांचा सिद्धांत :**हेगेल,कॉम्त व सायमन या तिघांनी ऐतिहासिक घटनांच्या पाठिमागे मानवी भावना असतात या भावनांमधुनच राष्टाचे भवितव्य ठरविले जाते असे विचार मांडले.मानवी भावनांच्या सिद्धांताविषयी गायकवाड,सरदेसाई डॉ.बी.एन.व हनमाने लिहितात की,**"हेगेल आणि कॉम्त या दोघांनी मानवी मन व भावना यांचा इतिहासातील कार्यकारणपरंपरेमध्ये जो प्रचंड सहभाग असतो त्याचे महत्व वेळोवेळी प्रसथापित केले आहे,"**[१२]

**ग) मार्क्सचा सिद्धांत :**मार्क्सने ऐतिहासिक घटनांच्यापाठीमागे आर्थिक कारण असते असा सिद्धांत मांडला संपुर्ण मानव जातीचा इतिहास हा वर्गसंघर्षाचाच इतिहास आहे हा विचार मांडला.मार्क्सने वर्गकलहाची कारणे देतांना आहे रे व नाही रे हे दोन वर्ग पाडले ते कार्यकारणभावच आहे. मार्क्सने ऐतिहासिक घटनांची कारणपरंपरा जोडत असतांना भौतिकवादी दृष्टिकोनातुन कार्यकारणभाव सिद्ध करूण दिला तसेच ज्या वर्गाच्या ताब्यात उत्पादनाची साधने असतात त्याच वर्गाच्या ताब्यात समाजाचे नेतृत्व असते हा निष्कर्ष म्हणजे कार्यकारणभावच आहे. मार्क्सचे साम्यवादाचे भाष्य हा सुद्धा कार्यकारणभावच आहे.

**ह) शास्त्रीय सिद्धांत :**इतिहासलेखनाची शास्त्रीय पद्धत रॅंकेने मांडली.ऐतिहासिक घटनेची सत्यासत्यता ठरवित असतांना कार्यकारणभाव,शास्त्रीय स्पष्टिकरण,अंतरंग व बाहय परिक्षण,वस्तुनिष्ठता हे सर्व संस्कार रॅंकेनेच इतिहासात आनले पुढे ब्युरीने इतिहास हे शास्त्र आहे असे जाहिर करूण इतिहासाला शास्त्रशुद्ध बनविण्याचा मार्ग खुला करूण दिला. ब्युरीनंतर अनेक इतिहासकारांनी यात मोलाची भर घालुन स्पष्टीकरण,नियम,सामाण्यीकरण,तत्वज्ञान इत्यादी बाबतीत कामगिरी करूण ऐतिहासिक संशोधनाला भौतिकशास्त्राचा दर्जा प्राप्त करूण दिला आहे.

**य) ऐतिहासिक मतप्रणाली:** जर्मनित ऐतिहासिक पद्धतीच्या विचारसरणीची स्थापना विल्यम डिथली यांनी केली.हेगेलची जगाच्या इतिहासाची कल्पना डिथलिने पुढे नेली.इतिहास हा घटनांवर आधारीत पन अनुभवांच्या सहाय्याने लिहावा असे मत व्यक्त केले.इतिहासातील ज्ञान हे गतकाळाशी सबंधीत असते गतकाळ व वर्तमानकाळ यांच्यातील कधिही न संपनारा संवाद म्हणजे इतिहास असे प्रो.कार म्हणतात.

जर एखादी घटना भुतकाळातील असुनसुद्धा जर ती वर्तमानकाळासाठी उपयुक्त ठरत असेल तर त्या घटनेला काही अर्थ असतो.ऐतिहासिक पद्धतीमध्ये कागदपत्राचा शोध

घेणे त्याचा अर्थ लावणे व निष्कर्ष काढणे अशी त्रिविध कामे केली जातात ही ऐतिहासिक पद्धत दिवसेंदिवस एक शास्त्रीय पद्धत म्हणुन माण्यता पावत आहे.

**जे) अनेकविध कारणांचा सिद्धांत :**इतिहासामध्ये पुर्वी अशी समजुत होती की,एखादी घटना घडण्यासाठी एकच कारण असते ते म्हणजे दैवी कारण परंतु हळुहळू या कारणपरंपराच्या सिद्धांतामध्ये बदल होत गेला व आज एखादी ऐतिहासिक घटना घडत असतांना राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक,प्रशासकिय पक्षाचे धोरण इत्यादी अनेक कारणे असू शकतात इतिहासाच्या सहाय्यकारी शास्त्रांमध्ये गृहित धरलेली कारणे आणि इतिहासातील अनेक कारणे या सर्वाचा समन्वय साधुन एखाद्या घटनेचा कार्यकारणभाव शोधला जातो.

**के) परिस्थितीचा सिद्धांत :** इतिहासकार ओकेशहॉट यांचे असे म्हणणे आहे की,**परिस्थितियो की समुचित व्याख्या में ही कारण के स्पष्ट प्रभाव को ढुंढा जा सकता हैं अतः कार्यकारण सम्बंधोका उचित वर्णन जब परिस्थितियो के संदर्भ मे किया जाता है तब घटना के कारण स्वरुप परिस्थितियॉ महत्व प्राप्त करती हैं,"[१३]**

प्रो.वाल्शनेसुद्धा यासंदर्भात लिहिले आहे की,कोणत्याही अंतिम कारणाचे ज्ञान तेव्हाच शक्य आहे जेव्हा गतकाळातील परिस्थितीच्या संदर्भात त्याच्या प्रभावाला शोधले जावे.

**एल) योगायोगाचा सिद्धांत** :पहिल्या महायुद्धानंतर योगायोगाचा सिद्धांत मांडला जाऊ लागला.एखादी घटना अचानक,अनपेक्षित घडते तिची कारणे कळत नाहीत तो योगायोग वाटतो.इतिहासात अनेक कारणांचे स्पष्टीकरण मिळत नाही.अनेक गोष्टी अकालनिय वाटल्यामुळे ते योगायोग आहे असे समजले जात होते.इतिहासकाराने घटनेचे कारण शोधू नये.घटना योगायोगाने घडतात हे मान्य करुन इतिहास लिहावा परंतु याचा गहन विचार केल्यास कारणमिमांसेत योगायोगाला स्थान देण्याचे कारण नाही. कारण घडनारी घटना कोणत्यातरी कारणाने घडते.

**६) इतिहासातील कारण व संदर्भ** :इतिहासामध्ये जी कारणे दिलेली असतात ती कारणे व त्याचा संदर्भ ही इतिहासलेखन प्रकियेत एका विशिष्ट साच्यात बसविली जातात.इतिहासात एखाद्या घटनेची दोन्ही बाजू आपले मत मांडत असतांना पुरावा सादर करतात त्यामुळे त्यातील कोणती बाजू सत्य हा एक प्रश्न सतत विचारला जातो. ज्यावेळी ही कारणपरंपरा व त्याचा संदर्भ हा प्रस्थापित केला जातो तेव्हा त्वदज बंनेम व त्मंस बंनेम असे दोन प्रकार करून त्यामध्ये संदर्भ प्रस्थापित केला जातो. इतिहासकाराने आपली विचारसरणी निश्चित करूण त्या विचारसरणीनुसार कारणे शोधली पाहिजेत म्हणजे कारणेही स्पष्ट होतात आणि संदिग्धपना राहत नाही. कार्यकारणभावात घटनांची निवड व वैयक्तिक दृष्टिकोन हा सर्वात महत्वाचा असतो.

**निष्कर्षः**

इतिहास कसा घडला?बदल घडुन येण्यासाठी कोणकोणत्या घटना घडल्या?त्यासाठी कोणकोणती कारणे कारणीभुत ठरली?या कारणांचा शोध घेणे व या प्रश्नाची उत्तरे शोधने म्हणजे कार्यकारणभाव होय. इतिहासलेखनशास्त्रात कारणमिमांसा उच्च दर्जाच्या इतिहास लेखनाचे लक्षण मानल्या जावू लागले आहे. कारणमिमांसेखेरिज इतिहास निर्जीव ठरतो.प्रत्येक घटनेमागे कारण असते,त्या घटनेचे परिणाम म्हणजे पुढे घडणा-या घटनेचे कारण असते.अशी कारण परिणामाची कडी तयार होते आणि अशी एक-एक कडी जुळवत गेले की,घटनांचा अन्वयार्थ लागतो.यालाच इतिहासातील कारणमिमांसा असे म्हणतात. कारणमिमांसेच्या स्पष्टीकरणाने इतिहासलेखन अर्थपुर्ण होत असते.इतिहासाला सजिवता प्राप्त होते व इतिहास बोलका होतो.इतिहासाला अर्थपूर्णता येते.

**संदर्भ ग्रंथसुची**

१) कोठेकर शांता,''इतिहास तंत्र आणि तंत्रज्ञान''श्री साईनाथ प्रकाशन नागपूर २००५ पृष्ठ क्र.८४
२) शेख गफुर,''इतिहासलेखनशास्त्र''प्रितम पब्लीकेशन जळगाव,२००७ पृष्ठ क्र.१४७
३) गद्रे प्रभाकर,''इतिहासलेखनाच्या परंपरा''श्री मंगेश प्रकाशन नागपूर,२००४ पृष्ठ क्र.२६
४) सरदेसाई बी.एन.''इतिहासलेखनपद्धती''फडके प्रकाशन कोल्हापूर २०११ पृष्ठ क्र.४१
५) शेख गफुर,''इतिहासलेखनशास्त्र'' प्रितम पब्लीकेशन जळगाव,२००७ पृष्ठ क्र.१४७

६) गायकवाड,सरदेसाई डॉ.बी.एन.व हनमाने, ‘‘इतिहासलेखनशास्त्र’’ फडके प्रकाशन कोल्हापूर १९९६ पृष्ठ क्र.११४
७) कित्ता पृष्ठ क्र.११६
८) कोठेकर शांता,‘‘इतिहास तंत्र आणि तंत्रज्ञान’’श्री साईनाथ प्रकाशन नागपूर २००५ पृष्ठ क्र.८५
९) गायकवाड,सरदेसाई डॉ.बी.एन.व हनमाने, ‘‘इतिहास लेखनशास्त्र’’ फडके प्रकाशन कोल्हापूर १९९६ पृष्ठ क्र.१२२
१०) सरदेसाई बी.एन. ‘‘इतिहास लेखन पद्धती’’ फडके प्रकाशन कोल्हापूर २०११ पृष्ठ क्र.४३
११) गायकवाड, सरदेसाई डॉ.बी.एन.व हनमाने, ‘‘इतिहासलेखनशास्त्र’’ फडके प्रकाशन कोल्हापूर १९९६ पृष्ठ क्र.१२२
१२ कित्ता पृष्ठ क्र.१२६
१३) खुराना के.एल.व बंसल आर.के.‘‘इतिहास लेखन धॉरनाऍं तथा पद्धतियॉं’ ’लक्ष्मी नारायन अग्रवाल प्रकाशन आगरा २०१२ पृष्ठ क्र.४५